प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CIDCO WE MAKE CITIES
सिडको शहरांचे शिल्पकार

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
**Regd. Office:** Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
**Head Office:** CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: ratambepriya@gmail.com

**दि. १६.०३.२०२०**

# करोना विषाणूचा प्रसार व लागण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर सिडको भवन, रायगड भवन व सिडकोच्या अन्य कार्यालयांमध्ये मध्ये अभ्यागतांना तात्पुरती प्रवेश बंदी

सध्या जगभरात पसरलेल्या करोना विषाणूची लागण राज्यातील काही भागात झाली असून सदर रोगाच्या प्रसार टाळण्यासाठी शासनातर्फे विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून मंत्रालयात सर्व प्रकारच्या अभ्यागतांना तात्पुरती प्रवेशबंदी करण्यात आली आहे. याच पार्श्वभूमीवर सिडको महामंडळानेदेखील अभ्यागतांच्या गर्दीवर नियंत्रण आणण्यासाठी अभ्यागतांच्या प्रवेशावर तात्पुरती बंदी आणण्याचा निर्णय घेतला आहे.

करोना विषाणूचा संसर्ग, प्रसार व लागण गर्दीच्या ठिकाणी जास्त होतो. सिडको महामंडळात देखील सामान्य नागरिकांसोबतच इतर आस्थापना, एजन्सी व कंपनीतील अधिकारी त्याचप्रमाणे कंत्राटदार यांसारख्या अभ्यागतांचा वावर मोठ्या प्रमाणावर असतो. यातून सदर विषाणूच्या संसर्ग, प्रसार व लागण होण्याची शक्यता आहे. यामुळे सिडको प्रशासनाने सर्व प्रकारच्या अभ्यागतांना सिडको भवन, रायगड भवन व सिडकोची अन्य सर्व कार्यालये येथे पुढील सूचनेपर्यंत प्रवेशबंदी करण्याचा निर्णय घेतला आहे.

नागरिकांना सिडको प्रशासनातर्फे सर्व अभ्यागतांना विनंती करण्यात येत आहे की त्यांनी पुढील सूचनेपर्यंत सिडको भवन, रायगड भवन व सिडकोची अन्य कार्यालये येथे भेट देऊ नये. सदर अभ्यागतांना अतिशय तातडीचे काम असल्यास त्यांनी पत्रव्यवहार, दूरध्वनी, भ्रमणध्वनी, ईमेल अथवा मेसेजद्वारे संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्याशी संपर्क साधावा अशी नम्र विनंती करण्यात येत आहे.

करोना विषाणूची लागण ही राष्ट्रीय आपत्ती आहे. त्यामुळे सिडकोतर्फे घेण्यात आलेल्या या निर्णयास सर्व अभ्यागतांनी सहकार्य करून आपली सामाजिक जबाबदारी पार पाडावी अशी नम्र विनंती करण्यात येत आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**